International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.4 March – April 2024

# विवेकानंदांच्या तत्वज्ञानाची आजच्या सामाजिक जीवनात उपयोगिता

**प्रा डॉ. अरुण शिंदे [1], डॉ.विवेक कोतेकर[2]**
*[1]चंद्राबाई शां. शेंडूरे कॉलेज, हुपरी, कोल्हापूर*
*[2]राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर*
*Corresponding Author - प्रा. डॉ. अरुण शिंदे*
**DOI - 10.5281/zenodo.10939258**

***सारांश :***

*सद्यकालीन परिस्थितीमध्ये सामाजिक जीवनाचा स्तर हा बहुतांशी ठिकाणी खालावत चालल्याचे दिसून येत आहे. उपभोगवादी संस्कृतींचे आचरण करण्याबरोबर त्यांच्या समस्या आणि आव्हानेही आपल्याकडे येत आहे हे या संस्कृचींचे आचरण करणारे लोक सोयीस्कररीत्या विसरत आहेत. बहुतांशी तरुण पिढी मोबाईल व इंटरनेटच्या आहारी गेलेली आहे. या खोल गर्तेत अडकलेल्या पिढीला बाहेर काढणार कसं हा यक्षप्रश्न समाजातील जाणकारांसमोर आहे. मानवी मूल्यांचा ऱ्हास होत चाललेला आहे. लोकांची विचारप्रणाली विपरीत होत असल्याचे दिसून येत आहे. पंचेंद्रियांच्या व मनाच्या समाधानासाठी जीवन जगणे हेच अनेकांचं ध्येय बनू पाहत आहे. आजच्या या परिस्थितीवर काय करता येईल? ही वैचारिक परिस्थिती बदलण्यासाठी काय उपाय आहेत? एका प्रगल्भ जाणीवेतून माणसाने स्वतःच्या जीवनदृष्टीमध्ये व वैचारिक साच्यामध्ये परिवर्तन करणे हा सर्वोतम उपाय आजच्या काळासाठी आहे. हेच आपल्याला कृतीशील विचारवंत व समाजप्रबोधनकार स्वामी विवेकानंद यांच्या आचरणात व विचारात दिसून येते. विवेकानंदांच्या विचारांचा आजच्या सद्यकालीन समाजात काय उपयोग करून घेता येईल याचा आढावा प्रस्तुत लेखामध्ये घेतलेला आहे.*

---

**प्रस्तावना :**

प्राचीन काळापासूनच भारत अवघ्या विश्वाला मार्गदर्शक ठरत आलेला आहे. प्राचीन साधू-संत, तत्वचिंतक, विचारवंत यांनी अपरोक्ष अनुभूतीच्या आधारे गुह्य ज्ञान प्राप्त करुन समाजमनावर प्रबोधनाचा हुंकार भरला. भारतीय विचारवंत आणि पाश्चात्य विचारवंत यांच्यातील फरक कोणता? ज्ञान-विज्ञानाच्या बाबतीत दोघेही तुल्यबळ होतेच, पण अनुभवजन्य ज्ञानाच्या बाबतीत भारतीय पाश्चात्यांच्या तुलनेत उजवे ठरताना दिसतात. चार्वाक, गौतम, तीर्थंकरापासून सुरु झालेली ही प्रबोधनाची परंपरा अलिकडे तुकडोजी महाराजापर्यंत आलेली दिसून येते. याच प्रबोधन परंपरेतील एक ठळक, प्रगल्भ आणि परखड व्यक्तिमत्व म्हणजे नरेंद्रनाथ दत्त उर्फ स्वामी विवेकानंद.

आज सर्वांत गंभीर समस्या निर्माण झाली आहे ती म्हणजे, भारतीय जाणकारांनी सांगून

ठेवलेल्या मूल्यांच्या उध्वस्तीकरणाची. चारित्र्य, क्षमता, सत्य-वास्तवता, सेवा, त्याग याकडे समाज पध्दतशीरपणे डोळेझाक करत आहे. खरा धर्म अंगीकारायला लोक नाकारत आहेत. वाट्टेल त्या मार्गाने श्रीमंत होण्याची स्पर्धा चालू आहे. नैतिक मूल्यांचं पाळणाघर म्हणजे कुटुंब हे उध्वस्त होत आहे. ज्ञान, भक्ती, योग याऐवजी अधिभौतिक मार्गावर मार्गक्रमण करणाऱ्या लोकांची संख्या वाढली आहे. यामुळे प्रेम, कृतज्ञता, संवेदनशीलता व निसर्गधर्मापासून माणूस कोसो दूर चालला आहे. यासाठी कधी नव्हे ते स्वामी विवेकानंदासारख्या द्रष्ट्या आणि कालातीत विचार मांडणाऱ्या व कृतीत आणणाऱ्या कृतीशील मार्गदर्शक प्रबोधनकाराच्या तत्वज्ञानाची समाजाला गरज भासू लागली आहे. त्यांनी भारतयात्रा करुन भारताची परिस्थिती अभ्यासली. जगात भारत म्हणजे एक दरिद्री, गरीब, खायला प्यायला नसणारा उघड्या-नागड्यांचा देश ही संकल्पना बदलवून भारतवर्षाच्या उज्वल आणि अनुभवजन्य ज्ञानाच्या महासागराचं दर्शन जगाला घडवलं. भारतीय तत्वज्ञान व वेदान्ताची ओळख जगाला देवून भारत एक जगाचा मार्गदर्शक आहे ही कठोर भूमिका त्यांनी तत्कालीन काळामध्ये घेतली.

भारतीय जनमाणसांना स्वामीजींनी माणूस निर्माण करणाऱ्या शक्तिदायी धर्माचा आदर्श शिकविला.भारतीयांना त्यांनी मानवरुपी देवदेवतांची सेवा हीच प्रत्यक्ष ईश्वराची सेवा होय, याचा उपदेश केला. यासाठी विवेकानंदांच्या तत्वज्ञानाचा थोडक्यात परामर्श घेऊया.

**'विश्वस्ता'ची संकल्पना:**

या देशामध्ये असलेल्या दारिद्र्याची, गरिबीची आणि रंजलेल्या गांजलेल्यांच्या परिस्थितीची विवेकानंदांना पुरती जाणीव होती. किंबहुना तत्कालीन भारतात अशी जाणीव असणारे विवेकानंद हे महत्त्वाचे प्रबोधनकार होते. याच्या मागचं कारण म्हणजे त्यांनी आसेतुहिमालय केलेली भारतयात्रा. या भारतयात्रेत अनेक ठिकाणी असलेली दारिद्रयाची अवस्था त्यांनी उघड्या डोळ्यांनी ह्दयद्रावकपणे पाहिली होती. म्हणूनच त्यांनी 'दरिद्रीनारायण' हा शब्द उच्चारला असे महात्मा गांधींना वाटते.

विवेकानंदांच्या मते मानवजात ही निसर्गाला सहाय्यक नसून त्याची प्रतिस्पर्धी आहे. याला कारणच मानवी उत्पत्तीपासूनचा आजपर्यंतचा इतिहास साक्षीला आहे. निसर्गाशी झालेला लढा हाच मानवी प्रगतीचा इतिहास आहे. पण जसा हा लढा निसर्ग विरुध्द मानव होता, तसा हा लढा मानवी मनातील पाशवी प्रवृत्ती विरुध्द आध्यात्मिक प्रवृत्ती असाही होता. यामध्ये बहुतांशी वेळेला पाशवी प्रवृत्तीच जिंकत गेली. म्हणून विवेकानंदांना वाटतं की, निसर्गाबरोबर त्याचा प्रतिस्पर्धी म्हणून जगत असताना पाशवी प्रवृत्ती की आध्यात्मिक प्रवृत्ती यातील लढा हा आध्यात्मिकतेच्या बाजून जिंकला गेला पाहिजे.

पण मुळात ही पाशवी प्रवृत्ती अथवा भावना का जनमाणसांवर हावी होत गेली. याचं कारण मनुष्याची लालसा, हाव, भूक, लोभ. या लोभापायीच काहीजण संपत्तीमध्ये लोळताना

दिसतात तर बहुतांशी जण दारिद्र्याच्या, कष्टाच्या जीवनात खितपत पडताना दिसतात. हे असं का होत गेलं? अशावेळेला विवेकानंद म्हणतात, मनुष्य हा त्याच्या संपत्तीचा विश्वस्त म्हणून जन्माला आला आहे, याचं त्याला भान नाही. निसर्गाची संकल्पनाच उपलब्ध संसाधनांच्या चक्राकार गतीतून उपभोग घेणे या प्रवृत्तीवर अवलंबून आहे. पण आत्मकेंद्री वृत्तीने उपभोगवादी संस्कृती बोकाळल्याने 'मी', 'माझं', 'मला' या संकल्पनांची निर्मिती झाली. मग ओरबाडणे सुरु झाले. परिणामी श्रीमंत श्रीमंत होत गेले, गरीब गरीब होत गेले. पाशवी, असामाजिक, आत्मकेंद्री वृत्तीचा विकास होत गेला. मी निसर्गाचा, त्याच्या साधनसंपत्तीचा एक 'विश्वस्त' आहे. ही उपलब्ध संसाधनं मला पुढच्या पिढीकडे यथायोग्य हस्तांतरित करायची आहेत ह्या दोन संकल्पना विवेकानंदासारख्या द्रष्ट्या विचारवंतांने तत्कालीन समाजात प्रखरपणे मांडणं हे एक विस्मयचं होतं.

**धर्माची निर्मिती :**

एक प्रश्न मानवासमोर यक्षप्रश्न म्हणून अनेक शतकांपासून उभा आहे. तो म्हणजे धर्माची निर्मिती कशी झाली. अनेक विभुतींनी, विचारवंतांनी, तत्वचिंतकांनी यावर विचारविनिमय केलेला दिसतो. विवेकानंदांचे मत याहून थोडसं विशेष वेगळं दिसतं. मागील मुद्द्यामध्ये आपण चर्चा केल्याप्रमाणे पाशवी प्रवृत्तींचा सतत विजय होत गेल्यामुळे सामाजिक व्यवस्था अधोगतीला लागली. सुख उपभोगवादी प्रवृत्ती वाढल्यामुळे दु:ख सुध्दा वाढले. मग या दु:खाला कसे कमी करायचे हा प्रश्न निर्माण झाला. यावर विवेकानंद म्हणतात की, पाशवी प्रवृत्ती व आध्यात्मिक प्रवृत्ती यामध्ये आध्यात्मिक प्रवृत्तींचा विकास कसा करावा हे शिकवण्यासाठीच धर्माची निर्मिती झाली. धर्म म्हणजे एका शब्दात सांगण्याची गोष्ट नाही. तरी सुध्दा सांगायचं झालं तर, धर्म ही साक्षात अनुभूती आहे. धर्म ही मनुष्याच्या अंतस्थातील चैतन्यमयी परमशक्तीचे प्रकटीकरण आहे. सर्वांत महत्त्वाचं म्हणजे, धर्म म्हणजे माणुसकी आहे. समाजामध्ये एखादा माणूस धार्मिक आहे म्हणजे कोण आहे? तर त्याच्या अंतरंगातील सात्विक व माणुसकीच्या भावना प्रवृत्ती शक्तीशाली झालेल्या असतात. समाजाविषयी त्याला कळवळा असतो. पण हे विशिष्ट माणसांपुरतेच मर्यादित झाले. समाजातील उर्वरित हजारो-लाखो लोकांचं काय? त्यांना त्यांच्या जीवनात मार्गदर्शक म्हणून धर्म हवा असतो. कसं वागांव, कसं बोलावं? कसं आचरण करावं? यासाठी कोणत्यातरी मानदंडाची गरज असते. ती धर्म पूर्ण करतो. यासाठी सर्वधर्म परिषदेच्या अखेरच्या सत्रात ते म्हणतात,'ख्रिस्ती माणसाला हिंदू वा बौध्द होण्याची गरज नाही अथवा हिंदू या बौध्दालाही ख्रिस्ती बनण्याचे प्रयोजन नाही, तर प्रत्येकाने स्वत:चे वैशिष्ट्य कायम राखून इतर धर्मातील सारभाग ग्रहण केला पाहिजे आणि त्याव्दारे समृध्द होऊन स्वत:च्या प्रकृतीनुसार वृध्दिंगत होत गेले पाहिजे.'

**विशेषाधिकारावर भाष्य :**

स्वामीजी एके ठिकाणी लिहितात की,

वैयक्तिक आणि सामाजिक जीवनात धर्म परिणामकारक व्हावा असे वाटत असे तर त्याच्यासाठी प्रचंड उत्साहाची आवश्यकता आहे. पण त्यामुळे संकुचित संप्रदाय निर्माण होणार नाही याची खबरदारी आपण घेतली पाहिजे. यासाठी एक 'असांप्रदायिक संप्रदाय' तयार झाला पाहिजे. जिथं सार्वजनिक धर्माचा, विश्वधर्माचा उदार व व्यापक भाव देखील राहिलं.

समाजामध्ये अधिकार असलेल्या लोकांकडून इतर जनांना कब्जात ठेवले जाते. जुलूम जबरदस्ती केली जाते. तिरस्काराने आणि तुच्छतेने पाहिले जाते. हा अधिकार तत्कालिन समाजातही अनेकांकडे होता. यासाठी विवेकानंद म्हणतात, यासाठी सर्व धर्मांची शिकवण आहे समान भाव, विश्वबंधुत्वाची भावना. यासाठी त्यांनी त्यांच्या समूहात प्रवेश करणाऱ्यांना कोणतीही अट ठेवली नाही. चारित्र्य घडवण्यासाठी, खाण्यापिण्यासाठी विशिष्टच नीतीप्रणालीचा आग्रह धरला नाही. एक खबरदारी घ्यायला सांगितली ती म्हणजे माझ्यामुळे दुसऱ्याचे नुकसान होणार नाही, अनिष्ट होणार नाही.

ज्याच्यामुळे पतन होते, प्रगतीच्या मार्गात अडथळा होतो तो धर्म नव्हे तो अधर्म होय. ते पुण्य नव्हे ते पाप होय. त्यामुळे आजची सामाजिक, आर्थिक धार्मिक परिस्थिती पाहता, या विशेषाधिकारावर केलेल्या विचारमंथनाची समाजाला किती गरज आहे हे प्रकर्षाने दिसून येते. त्यासाठी सर्वसमान असणाऱ्या वैश्विक धर्माची अपेक्षा विवेकानंद या ठिकाणी ठेवतात.

या संदर्भात एकदा विवेकानंदांना एका वृत्तपत्राने टोकले असता ते म्हणाले होते, ' 'भ्याडांप्रमाणेच जीवन जगण्यासाठी माझा जन्म झालेला आहे, असे तुम्हाला म्हणायचे आहे काय? मी भित्रेपणाचा तिरस्कार करतो, भित्र्या लोकांशी मला काहीही देणेघेणे नाही. मी जितका भारताचा आहे तितकाच संपूर्ण जगताचाही आहे आणि याबद्दल चर्चाविवाद मुळीच असता कामा नयेत. राष्ट्राचा माझ्यावर विशेष अधिकार थोडाच आहे? मी काही राष्ट्राचा गुलाम नाही. मानवापेक्षा किंवा ईश्वरापेक्षा किंवा सैतानापेक्षाही एक फार मोठी सत्ता माझ्या पाठीशी उभी आहे, हे मी जाणून आहे. मला कुणाच्याही साहाय्याची गरज नाही. मी स्वत:च संपूर्ण जीवनभर इतरांना साहाय्य करीत आलेलो आहे.''

**नैतिकता - चारित्र्याचा खरा पाया :**

आध्यात्मिक प्रवृत्ती विकसित करायची असेल तर नेमकं काय केलं पाहिजे यावर विवेकानंदांनी कृतीतून उत्तर दिलं आहे. ते म्हणतात, नैतिकता हाच आध्यात्मिक जीवनाचा पाया आहे. सत्य, अहिंसा, ब्रम्हचर्य, अस्तेय, पवित्र आणि कठोर साधना या गोष्टी वगळून आध्यात्मिकता असूच शकत नाही. त्याठिकाणी या नियमांचे काटेकोरपणे व कसोशिने पालन होते तिथेच आध्यात्मिक विभूती व विकासपुरुष निर्माण होताना दिसतात. आज समाजामध्ये नैतिकतेची प्रचंड घसरण सुरु आहे. नीतीमत्ता, नीतीमुल्य याची थोडीशीही जाण समाजामध्ये आहे की नाही याची शंकाच विचारवंताच्या मनात काहूर माजवत आहे.

म्हणून भारतीय युवक म्हणून ही शुचिमा व चारित्र्याची घसरण रोखण्याचं डोफ्लगराएवढं कार्य आपल्याला हाती घ्यायचं आहे. ही घसरण ज्या वेगाने होत आहे, की एकही क्षण वाया घालवणे म्हणजे मानवजातीचा घात करण्यासारखे आहे. चारित्र्य म्हणजे मानवजातीचा घात करण्यासारखे आहे. चारित्र्य कुठून निर्माण होते. सत्य वागण्यातून, सत्य बोलण्यातून, सत्य आचरणात आणण्यातून. तसेच विवेकाने व वैचारिक व शारिरीक वैराग्यातून. मग चारित्र्य वाढवण्यासाठी, त्याची घसरण रोखण्यासाठी चर्चासत्र, संवाद, कार्यशाळा, व्याख्यानमाला आयोजित करणे हा मार्ग नाही. स्वत:पासून ताबडतोब नैतिक वागणे व चारित्र्यनिर्मितीचा प्रारंभ करणे हा खरा मार्ग आहे आणि याचा सर्वोच्य अविष्कार म्हणजे विवेकानंद. विवेकानंद यासाठी महत्त्वाचे आहेत की, त्यांनी पोकळ भाषणबाजी, व्याख्यानबाजी न करता समाजाला आणि युवकाला स्वत:च्या कृतीतून चारित्र्य आचरणाची शिकवण दिली. नैतिकतेचं तत्वज्ञान शिकवलं. त्या विवेकानंदांची आज आम्हाला नितांत गरज आहे. यासाठी ते कशाला हवेत? आम्हाला का नाही स्वत:पासून सुरुवात करता येणार?

**समारोप :**

आजच्या काळामध्ये युवकांना मार्गदर्शन करणारा, त्यांच्यात चारित्र्याची, नैतिकेची पेरणी करणारा आणि अंतस्थात असलेल्या परमशक्तीची जाणीव करुन देऊन त्याच्यातील सुप्तक्षमता जागृत करणारा विकासपुरुष म्हणून स्वामी विवेकानंदांकडेच आवर्जुन पहावं लागेल. यासाठी त्यांना प्रथमत: आपल्याला संकुचित विचारातून बाहेर काढावं लागेल. कोणत्याही धर्माचे तीन भाग आहे. तत्वज्ञान, कर्मकांड आणि साधना यापैकी तत्वज्ञान हाच धर्माचा खरा गाभा आहे हे विवेकानंद नेहमी सांगत. एक धर्म मानायचा असेल तर सर्व धर्म मानावे लागतील. एक धर्म नाकारायचा असेल तर सर्व धर्म नाकारावे लागतील. कारण सर्व धर्माच्या चिंतानाचा, विचारधारेचा पाया हा एकच आहे. धर्माचं महत्त्व हे आचरणात आहे. माणुसकी हाच खरा धर्म हे शेवटपर्यंत ते सांगत राहिले. भारताच्या अगणित दारिद्र्या व गरीब जनतेमध्ये ईश्वर आहे हे ते सतत कृतीतून सांगत. नुसतं ज्ञान हे शुष्क आहे. त्याला कृतीची जोड नसेल, ते बहुजनांच्या कल्याणाकरता उपयोगात येत नसेल तर त्या ज्ञानाची किंमत शुन्य आहे हे सांगणे म्हणजे किती धारिष्ट्याचे आहे याची केवळ आपण कल्पनाच करु जाणे. त्यामुळे स्वत:ला पहिल्यांदा बदलावे लागणार आहे. स्वत: बदलले तरच समाज बदलणार आहे. यासाठीच विवेकानंदांच्याच भाषेत, उतिष्ठत जाग्रत प्राप्य वरान्निबोधत..

**संदर्भ :**

१. *विवेकानंद जीवनचरित्र*, स्वामी निखीलानंद, रामकृष्ण मठ, नागपूर.

२. *स्वामी विवेकानंद ग्रंथावली संचयन*, रामकृष्ण मठ, नागपूर.

३. *स्वामी विवेकानंद ग्रंथावली* (खंड १ ते

१०), रामकृष्ण मठ, नागपूर.

४. *निसर्गायण*, दिलीप कुलकर्णी, राजहंस प्रकाशन, पुणे.

५. *स्वामी विवेकानंदांची खरी ओळख*, दत्तप्रसाद दाभोलकर, मनोविकास प्रकाशन, पुणे.

६. *शोध स्वामी विवेकानंदांचा* , दत्तप्रसाद दाभोलकर, मनोविकास प्रकाशन, पुणे.

७. *मी भारी तर गाव भारी*, डॉ. विवेक कोतेकर व विठ्ठल कोतेकर, विवेक पब्लिकेशन, कोल्हापूर.